# प्रेसनोट

दि. १४/०५/२०२५

## ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पिंपरी-चिंचवड पोलीस घटकातील हिंजवडी पोलीस स्टेशन येथील पोलीस उप निरीक्षक यांचेवर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | हिंजवडी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, गु.रं.नं. २६०/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये |
| तक्रारदार | स्त्री, वय ३० वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. दत्तात्रय नामदेव काळे, पद - पोलीस उप निरीक्षक, हिंजवडी पो. स्टे. पिंपरी - चिंचवड आयुक्तालय, पुणे (वर्ग-२, अराजपत्रित) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ६०,०००/- (साठ हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ३०,०००/- (तीस हजार) रुपये |
| लाच मागणी पडताळणी दिनांक | १५/०४/२०२५ |
| ठिकाण | हिंजवडी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रेम वाघमोरे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९९२३०४९५०२ ) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांच्या पतीविरुद्ध हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल असून, सदर गुन्ह्याचा तपास लोकसेवक दत्तात्रय काळे, पोलीस उप निरीक्षक यांचेकडे आहे. सदर गुन्ह्यांमध्ये त्यांच्या पतीला अटक करण्यात आलेले असून, सध्या ते न्यायालयीन कोठडीत असून, त्यांना नमुद गुन्ह्यातून जामीन मिळण्यासाठी तक्रारदाराने न्यायालयात दाखल केलेल्या जामीन आर्जवर तपास अधिकारी यांचे म्हणणे न्यायालयात सादर करण्यासाठी लोकसेवक दत्तात्रय काळे यांनी तक्रारदाराकडे ६०,००० रुपयाच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार दि. १५/०४/२०२५ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. १५/०४/२०२५ रोजी लोकसेवक दत्तात्रय काळे यांचेकडे पंचासमक्ष पडताळणी केली असता, त्यांनी तक्रारदाराकडे वरील कामासाठी सुरवातीस ६०,००० रुपयाची लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती ३०,००० रुपयाची लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाल्याने, लोकसेवक दत्तात्रय काळे, पोलीस उपनिरीक्षक यांचेविरुद्ध आज दि. १४/०५/२०२५ रोजी हिंजवडी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय येथे गु.र.नं. २६०/२०२५, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

14/5/25

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक
सत्यमेव जयते
ॲन्टी करप्शन ब्युरो

Scanned with CamScanner